# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पुणे शहर पोलीस वाहतुक मुख्यालयाकरिता औंध येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत.**

**(१) ९६८९ (०६-०४-२०१५). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर पोलीस वाहतुक मुख्यालयाकरिता औंध येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबत निवेदन माहे जानेवारी, २०१५ वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६) :**(१) व (२) पुणे येथील औंध वाहतुक शाखेकरीता पोलीस विभागाची जागा उपलबध असून, पुणे शहर पोलीस वाहतुक मुख्यालयाकरीता नवीन प्रशासकीय इमारत बांधण्याबाबतचा प्रस्ताव व खर्चाचे अंदाजपत्रक सुधारीत दरसूचीवर आधारीत मागविण्यात येवून उपलब्ध निधी विचारात घेवून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बॉम्बशोधक कर्मचा-यांचा जोखीम भत्ता बंद असल्याबाबत**

**(२) १९४३० (१२-०८-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मध्ये बॉम्बशोधक कर्मचा-यांना जोखीम भत्ता सन २०१२ पासून बंद असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोखीम भत्ता मिळत नसल्याने कर्मचारी बदली करुन घेत असून मुंबई मध्ये बॉम्बशोधक पथकात केवळ १० अधिकारी आणि १४० अंमलदार असे अपुरे कर्मचारी आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहर कायम दहशतवादी निशान्यावर असल्याने बॉम्बशोधक पथकातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच जोखीम भत्ता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) नाही. हे खरे नाही.

बॉम्ब शोधक व नाशक पथकात दिनांक २२.११.१९९५ च्या विशा-४ च्या शासन निर्णयान्वये ४१ पदे विशेष वेतनाची (जोखीम भत्ता) मंजूर करण्यात आली आहे.

दिनांक ३१.१२.२००९ च्य पोल-३ च्या शासन निर्णयान्वये ६५ पदे मंजूर करण्यात आलेली असून त्यापैकी ४० पदांना २०१३ च्या आदेशान्वये विशेष वेतनाची (जोखीम भत्ता) मंजूर करण्यात आले आहे.

दिनांक १४.०७.२००७ च्या पोल-३ च्या शासन निर्णयान्वये २ पदे दिनांक ०८.०९.२०१० च्या पोल-३ च्या शासन निर्णयान्वये ५६ पदे अशी एकूण ५८ पदे मंजूर करण्यात आलेली आहे, तथापि सदर पदांना विशेष वेतन (जोखीम भत्ता) मंजूर करण्यात आले नाही.

(२) बॉम्ब शोधक व नाशक पथकात कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कर्तव्यकाळ पुर्ण झाल्यानंतर ते अन्य ठिकाणी बदलीस पात्र असतात.

बॉम्ब शोधक व नाशक पथकात सद्यस्थितीत १६४ पदे मंजूर एकूण ९९ पोलीस अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत.

बॉम्ब शोधक व नाशक पथक येथे मनुष्यबळ वाढवून मिळण्याकरीता प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल.

(३) सद्या मुंबईतील वाढती लोकसंख्या, मुंबईत असलेल्या दहशतवदाचा संभाव्य धोका यामुळे कामाचा वाढता व्याप पाहता बॉम्ब शोधक व नाशक पथकातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच विशेष वेतन (जोखीम भत्ता) मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली पोलीस ठाण्याच्या प्रस्तावित इमारतींचे काम निधी अभावी बंद असल्याबाबत

**(३) २९३०१ (२१-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील कणकवली पोलीस ठाण्याच्या प्रस्तावित इमारतींचे काम निधी अभावी गत दोन वर्षापासून बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६)** :(१) व (२) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या बांधकामासाठी सन २००७-०८ च्या दरसूचीवर आधारीत पोलीस दलाच्या आधुनिकीकरण योजनेतंर्गत रु.१,१९,७५,०००/- एवढ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. अंदाजपत्रकाच्या किंमतीमध्ये वाढ झाल्याने सुधारीत प्रस्ताव मागविण्यात येत असून, सदर पोलीस ठाण्याच्या इमारतीच्या बांधकामास उपलब्ध निधीचा विचार करुन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत**

**(४) ३३१६४ (२१-०१-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात सर्व रस्त्यात खड्डेच खड्डे झाले असून सदर खड्डे महानगरपालिकेकडून माती टाकून तात्पुरते बुजविले जातात. त्यामुळे रस्ते सर्वत्र उखडले जात असल्याने शहरात सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले आहे तसेच येथील नागरीकांना खड्ड्यामुळे मरणयातना सहन कराव्या लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील रस्त्याचे खड्डे मातीने बुजविण्यास महानगरपालिकेला मनाई करण्याचे आदेश देऊन रस्त्यांचे डांबरीकरण करण्याची मागणी येथील नागरीकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.

(२) नागरिकांनी केलेल्या मागणी बाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद कार्यालयाकडून औरंगाबाद महानगरपालिकेस कळविण्यात आलेले नाही. तथापि मुख्य रस्त्यावरील खड्डे सिमेंट क्रॉकिट व पेव्हरब्लॉक व्दारे बुजविण्यात आले व अरुंद गल्यामधील रस्ते मेटल व मरुमाव्दारे बुजविण्यात आले आहेत. कोणत्याही रस्त्यावरील खड्डे मातीने बुजविण्यात आलेले नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील मेहुणाबारे पोलीस ठाण्यात पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत**

**(५) ३८५९७ (२१-०१-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील मेहुणाबारे पोलीस ठाण्यात केवळ ३० पोलीस असताना त्यांचेकडे ५५ गावांना सुरक्षा पुरविण्याचे काम सोपविण्यात आल्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावांची संख्या विचारात घेता मेहुणबारे पोलीस ठाण्यातील पोलीसांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) चाळीसगांव (जि.जळगांव) तालुक्यातील मेहुणाबारे पोलीस ठाण्यातील कार्यक्षेत्रात ५५ गावांचा समावेश आहे. मेहुणाबारे पोलीस ठाण्यासाठी १९ पोलीस अधिकारी/कर्मचारी असे संख्याबळ मंजूर असून सद्य:स्थितीत तेथे २७ पोलीस अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत.

(२) मेहुणाबारे पोलीस ठाण्याचे मनुष्यबळ वाढविण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, जळगाव यांच्याकडून पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांना प्राप्त झाला आहे. तथापि याबाबतचा सुधारीत प्रस्ताव पोलीस अधीक्षक, जळगांव यांच्याकडून पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांच्याव्दारे मागविण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव शासनास प्राप्त होताच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जे.एन.पी.टी. व उरण (जि.रायगड) तालुका परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याबाबत**

**(६) ३९०४१ (२१-०१-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जे.एन.पी.टी. व उरण (जि.रायगड) तालुका परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात अपघात होऊन मृत्यूचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपघातात मृत्यूमुखी पडणाऱ्यांच्या नातेवाईकास व जखमींना विमा योजनेच्या माध्यमातून आर्थिक मदत मिळवून देण्याबाबत तसेच अपघात कमी करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) जे.एन.पी.टी. व उरण (जि.रायगड) परिसरामध्ये सन २०१५ मध्ये ४७ अपघातामध्ये ४२ जण मयत झाले असून २२ जण जखमी झालेले आहेत. सन २०१६ मध्ये मे अखेरीस १९ अपघात झाले असून त्यामध्ये १९ जण मयत व ६ जण जखमी झाले आहेत.

(२) रस्ते अपघातामधील मृत व्यक्तींच्या वारसांना आणि जखमींना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणमध्ये नुकसान भरपाई दावा दाखल करण्याकरीता तसेच, विमा कंपनीकडे विमा मागणी करण्याकरिता पोलीस विभागाकडून आवश्यक कागदपत्रे पुरविण्यात येतात.

अपघात टाळण्याकरिता जे.एन.पी.टी. परिसरातील रस्त्यांचे रुंदीकरण, पार्किंग लॉटची निर्मिती, पुलाची दुरुस्ती, नवीन पूल बांधणे अतिक्रमणे हटविणे इ.बाबत जे.एन.पी.टी. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सिडको आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यासमवेत वेळोवेळी बैठकांचे आयोजन केले जाते राज्य महामार्ग ५४ वर गव्हाण टाकी ते जे.एन.पी.टी. दरम्यान सायंकाळी ५.०० ते ८.०० वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. शासन निर्णय, नगर विकास विभाग दि. ४.७.२०१५ अन्वये जे.एन.पी.टी. प्रभावित क्षेत्रासाठी उच्च स्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून समितीकडून सुरक्षा व वाहतूक व्यवस्थापनासंबंधातील अडचणीवर निर्णय घेण्यात येतो

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये आंबा-विशाळगड मार्गावरील वाघझारा विश्रांती स्थळाच्या दुरवस्थेबाबत

**(७) ३९९५१ (२०-०५-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यामध्ये आंबा-विशाळगड मार्गावरील वाघझारा या पर्यटन स्थळाला अनेक पर्यटक भेट देतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून पाला-पाचोळ्यांचे ढीगच ढीग पहावयास मिळत असून वन विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याने परिसर अनेक समस्यांच्या विळख्यात सापडला असून पर्यटन स्थळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच अनेक मद्यपिकडून रिकाम्या बाटल्या पाणी प्यायच्या विहिरीमध्ये अथवा परिसरामध्ये फेकल्या जातात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वाघझरा पर्यटन स्थळ वाचविण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) हे खरे आहे.

(३) हे अंशतः खरे आहे.

(४) व (५) या ठिकाणी पायऱ्या, पॅगोडा, विहीरीची दुरुस्ती व वृक्षाना कठडे अशी कामे करण्यात आलेली आहेत. वन विभागामार्फत आठ्वड्यातून किमान दोन वेळा या पर्यटन स्थळाची साफसफाई केली जाते. तसेच आलेल्या पर्यटक भाविकांना पर्यटन क्षेत्रात प्लास्टिक अनावश्यक कचरा इतस्तत: न टाकणे बद्दल सूचना दिल्या जातात सदरचा कचरा हा कुंडीतच टाकावा, असे आवाहन केले जाते. सदर पर्यटन स्थळ हे वन संरक्षण समितीच्या ताब्यात देण्यात येणार असून पर्यटक भाविकाकडून स्वच्छता कर वसुली करुन येणाऱ्या निधीतून वाघझरा पर्यटन स्थळ सुरक्षित व स्वच्छ ठेवण्यात येणार आहे.

---

**नागपूर वाहतूक शाखेत चालान बुकचे ऑडीट होत नसल्याबाबत**

**(८) ४०२६८ (१६-०५-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर वाहतूक शाखेच्या चालान बुकचे ऑडीट केले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर वाहतूक शाखेकडून ४ कोटी ५ लाख रूपयाचा दंड वसुल केलेला असूनही चलान बुकचे ऑडीट झालेले नाही, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, नागपूरातील वाहतूक पोलीस बनावट चलान बुकचा सर्रासपणे वापर करीत असल्याची शक्यता नाकारता येत नसून त्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अभय प्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर वाहतूक विभागामध्ये होत असलेल्या गैरव्यवहाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वाहतूक शाखा अंतर्गत वाहन चालकास देण्यात येणाऱ्या चलानाव्दारे तडजोड शुल्क स्विकारण्यात येत नसल्याने चालन बुकचे ऑडीट केले जात नाही.

वाहन नियमाचे उल्लघन करणाऱ्या कसुरदार वाहनचालकांकडून स्वतंत्रपणे जी.एन.पावतीव्दारे तडजोड शुल्क स्विकारण्यात येते. तसेच जी.एन.बुकचे रेकॉर्ड ठेवून त्याचे लेखापरिक्षण केले जाते.

(२) सन २०१५ मध्ये नागपूर वाहतूक शाखेने वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या ३,५६,८४५ कसुरदार वाहनचालकांकडून रु. ४,०५,०९,७००/- एवढा दंड वसूल केला आहे.

वित्तीय वर्ष २०१५-२०१६ करीत दि. २.३.२०१६ रोजी लेखा परिक्षण करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सदर चालान बुक शासकीय मुद्रणालयाकडून प्राप्त होतात. त्यावर अनुक्रमांक नमुद असून त्याचे वाटप करण्याकरीता वाहतूक विभागांतर्गत जनवाहन कार्यलय स्वतंत्ररित्या कार्यान्वित आहे. त्याचा संपूर्ण रेकॉर्ड ठेवण्यात येतो. येतो.

(४) व (५) गैरव्यवहार आढळून न आल्याचे चौकशी करण्यात आलेली नाही.

---

**पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गॅसधारकांना आधारकार्ड मिळण्याबाबत**

**(९) ४०९६४ (१७-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यात १० हजार गॅसधारकांना शासनाकडून आधारकार्ड न मिळाल्याने सबसिडी योजनेचा फायदा मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गॅस धारकांना आधारकार्ड देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) मॉडीफाईड डायरेक्ट बेनिफट ट्रान्सफर फॉर एल.पी.जी. (MDBTL) योजना दि.०१ जानेवारी, २०१५ पासून सोलापूर जिल्ह्यात राबविली जात आहे. दि.०१/०१/२०१५ पासून एल.पी.जी. ग्राहकास त्यांच्या आधार कार्ड क्रमांक संलग्न आणि एल.पी.जी. ग्राहक क्रमांक सलग्न बँक खात्यामध्ये किंवा आधार कार्ड क्रमांक विरहित बँक खात्यामध्ये संबंधीत गॅस कंपन्याकडून अनुदान जमा केले जात आहे. कोणताही एल.पी.जी. ग्राहक केवळ आधार कार्ड क्रमांक नाही, म्हणुन अनुदान मिळण्यापासून वंचित राहिलेचे पंढरपूर तालुक्यात निदर्शनास आलेले नाही व अशा प्रकारची तक्रार ता.पंढरपूर मध्ये प्राप्त झालेल्या नाहीत.

---

**ठाणे येथे पोलिसांनी केलेल्या कारवाईत सुमारे १,३४२ महिलांची सुटका करण्यात आल्याबाबत**

**(१०) ४१२६१ (२०-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे गत ५ वर्षात छुपे कुंटणखाने, लॉज, मसाज पार्लर आदि ठिकाणी ठाणे पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथक व स्थानिक पोलिसांनी केलेल्या कारवाईत सुमारे १,३४२ महिलांची सुटका केल्याचे दिनांक ९ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांविरुध्द पोलिसांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच वेश्या व्यवसायास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणते कठोर कायदे वा उपाययोजना केलेले आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

(२) ठाणे पोलीस आयुक्त परिसरात परिमंडळ १ ते ५ येथील स्थानिक पोलीस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे यांनी सदर प्रकरणी गत ५ वर्षामध्ये एकुण १७६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ४६१ आरोपींना अटक करण्यात आले असून, ९०७ महिलांची सुटका करण्यात आली आहे.

(३) वेश्या व्यवसायास प्रतिबंध घालण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायदा व वेश्या व्यवसाय प्रतिबंध घालण्यासाठी गुप्त बामतीदारामार्फत माहिती काढून वेश्या व्यवसाय चालविणाऱ्याविरुध्द कठोर कारवाई करण्यात येते. याबाबत सर्व प्रभारी अधिकारी यांना सक्त सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरने युवतीच्या खोलीतील खिडकीच्या फटीत मोबाईल कॅमेऱ्याद्‌वारे चोरुन चित्रीकरण केल्याबाबत

**(११) ४१२६६ (२०-०५-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टर युवतीच्या खोलीतील खिडकीच्या फटीत मोबाईल कॅमेऱ्याद्‌वारे चोरुन चित्रीकरण करणाऱ्या फनीकुमार कोटा या प्रशिक्षणार्थी डॉक्टरला लक्ष्मीपूरी पोलिसांनी अटक केल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) होय.

(२) फिर्यादी प्रशिक्षणार्थी डॉक्टर युवतीने दिलेल्या फिर्यादीवरुन लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६/२०१६ भा.द.वि. कलम ३५४(क), ५०९ प्रमाणे आरोपी प्रशिक्षणार्थी डॉक्टर यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीसदि.९.१.२०१६ रोजी अटक करण्यात आले. आरोपीस न्यायालयात हजर केले असता, जामीन मंजूर केला आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तळेगाव चाकण (जि.पुणे) मार्गावर वाहने अडवून लुटमारीच्या घटना घडत असल्याबाबत

**(१२) ४१७०४ (२०-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील मौजे तळेगाव दाभाडे आणि एम.आय.डी.सी. या दोन पोलीस ठाण्याअंतर्गत विभागलेल्या तळेगाव चाकण मार्गावर वाहने अडवून लुटमारीच्या घटना घडत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुदुब्रे ते वडगाव फाटा या जवळपास १० कि.मी. पट्टयात पोलीस चौकी नसल्याने लुटमारीची घटना घडल्यास पोलीसाची मदत मिळत नाही , हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदर ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१६) :**(१) तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्याच्या हद्दीत तळेगाव चाकण मार्गावर लुटमारीची एकही घटना गतवर्षात घडलेली नाही. तसेच, तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गत वर्षात लुटमारीची एक घटना घडली आहे.
(२) या परिसरात तळेगाव स्टेशनजवळ वाहतूक पोलीस चौकी असून तेथे दोन पोलीस कर्मचारी व दोन पोलीस मित्र कार्यरत आहेत. तसेच, इंदोरी टोल नाक्याजवळ वाहतूक पोलीस मदत केंद्र असून एक पोलीस कर्मचारी व दोन पोलीस मित्र कार्यरत आहेत. सदर पोलीस कर्मचाऱ्यांकडून, तसेच पोलीस स्टेशन कर्मचाऱ्यांकडून या रस्त्यावर दिवसा व रात्री गस्त घालण्यात येते.
(३) सदर ठिकाणी पोलीस चौकी उभारण्याबाबत नागरीकांकडून किंवा लोकप्रतिनिधींकडून कोणतीही मागणी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कामशेत येथील महामार्गाचा 'सर्व्हिस रोड' नाहीसा होत असलेबाबत**

**(१३) ४१७९६ (२९-०४-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) कामशेत शहरातील तसेच पवना मावळ भागातून शहरात येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून महामार्गाच्या दुतर्फा सर्व्हिस रोडची निर्मिती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व्हिस रोडपासून सेवा मिळण्याऐवजी भलत्याच कामासाठी याचा वापर होऊ लागल्याने मूळ उद्देशच साध्य होत नसल्याने हे सर्व्हिस रोड नाहीसे होत असून त्याची जागा वाहनतळ व डम्पिंग ग्राउंडने घेतली आहे हे ही खरे आहे काय,
(३) रस्ते वाहतूक कायद्यानुसार महामार्गावर अथवा लगत तसेच सेवा रस्त्यावर वाहन पार्किंग करणे कायद्याने गुन्हा आहे, असे असताना या ठिकाणी अनेक वाहन व्यावसायिक त्यांच्याकडील अवजड वाहने, क्रेन, जे.सी.बी. थेट रस्त्यावरच रात्रंदिवस उभी करत असल्याने या रस्त्याचा वापर नागरिकांसाठी करणे जिकीरीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच स्थानिक पोलीस यंत्रणेचे लक्ष देवून हा सेवा रस्ता मोकळा करणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली आहे व करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६)** :(१) कामशेत भागातून जाणाऱ्या जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर सर्व्हिस रोड आहे. तथापि, मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर सर्व्हिस रोड नाही.
(२) व (३) हे खरे नाही.

जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर कामशेत भागात असलेल्या सर्व्हिस रोडवर कोणत्याही प्रकारची अवजड वाहने, क्रेन, जेसीबी रोडरोलर यासारखी वाहने पार्किग केली जात नाहीत. अशा प्रकारची वाहने पार्किंग केलेली आढळल्यास त्यांच्यावर तात्काळ मोटार वाहन कायद्यांतर्गत कारवाई केली जाते.
(४) जुन्या मुंबई-पुणे महामार्गावर कामशेत भागात असलेल्या सर्व्हिस रोडवर स्थानिक पोलीस स्टेशनकडून वाहतूक कर्मचाऱ्याची नेमणूक केली जाते. तसेच सन २०१५ मध्ये अशा अनधिकृत पार्किग करणाऱ्या ६० वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. ६,०००/- दंड वसूल केला आहे. मे, २०१६ अखेर २७ वाहनांवर कारवाई करुन रु. २,७००/- एवढा दंड वसूल केला आहे.

---

**रावळवाडी (जि.गोंदिया) येथील एका तरुणीचे अपहरण करुन तिच्यावर पुणे येथे बलात्कार करण्यात आल्याबाबत**

**(१४) ४२६४३ (१७-०५-२०१६). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रावळवाडी (जि.गोंदिया) येथील अपहरण केलेल्या तरुणीवर पुण्यात सामुहिक बलात्कार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अत्याचाराचा गुन्हा गोंदिया पोलीस नोंदवून न घेता, आपण स्वत:च्या मर्जीने पुण्याला गेलो होतो असा जबाब पिडीत तरुणीकडून लिहून घेऊन तिला तीच्या आईकडे न पाठविता परस्पर पुन्हा पुण्याला पाठविण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच सदर बलात्कार करणाऱ्या नराधमावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) नाही.

तपासाअंती सदरची घटना ही खोटी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(२) नाही.

पिडीत तरुणीने गोंदिया शहर पोलीस ठाणे येथे स्वहस्तक्षरात दोन पंचा सक्षम दि.२४.१२.२०१५ रोजी लिहून दिले आहे. तसेच पिडीत तरुणीच्या आईने सुध्दा दि.२४.१२.२०१५ रोजी माझी काही हरकत नाही असे जबाबात सांगितले आहे. त्यामुळे पिडीत तरुणी आपले आई वडीलांकडे न जाता तिचा पती राहूल शहारे (मित्र) याचेसह पुणे येथे गेली आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन गोंदिया येथे अप.क्र.२३६/१५ कलम ३६३ भादवि व तपासात कलम ३७६(ड), ५०६ (ब) भादंवि सह कलम ३(१) (१२) अ.जा.ज.अप्र.का. वाढविण्यात आले होते. आरोपीविरुध्द व्देषबुध्दीने खोटी तक्रार दिली असल्याचे गुन्ह्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याने “ब” समरी तयार करुन मा.न्यायालयात मंजूरीस्तव सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सणसवाडी (जि.पुणे) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये खंडणी मागणाऱ्या चौघा जणांना अटक केल्याबाबत**

**(१५) ४२८७८ (१७-०५-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सणसवाडी येथील औद्योगिक वसाहतीतील एका कंपनीत कामगार कंत्राटदाराला धमकावून खंडणी मागणाऱ्या चौघा जणांना दिनांक ७ नोव्हेबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शिक्रापुर पोलिसांनी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सणसवाडी व रांजणगांव औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक गाव पुढारी गावाच्या विकासाच्या नावाखाली कंपन्यांना त्रास देत असल्याच्या तक्रारी आल्या असून सदर वसाहतीत कुठलेही गस्त पथक नेमलेले नाही तसेच पोलीस चौक्या उभारलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही ठिकाणी पोलीस चौक्या उभारण्याबाबत तसेच गस्त पथक नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) औद्योगिक वसाहतीमध्ये अनेक गाव पुढारी गावाच्या विकासाच्या नावाखाली कंपन्यांना त्रास देत असल्याच्या कोणत्याही तक्रारी पोलीस स्टेशन शिक्रापूर व रांजणगावं येथे आल्या नाहीत. औद्योगिक विभागाचे संरक्षण व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी गस्ती पथक नेमण्यात आले आहे. शिक्रापूर पोलीस स्टेशन अंतर्गत औद्योगिक वसाहतीच्या जवळच कोरेगाव भिमा व तळेगाव ढमढेरे या पोलीस चौकी उभारण्यात आल्या आहेत. तसेच दिनांक १५.०८.२०१४ पासून रांजणगाव एम.आय.डी.सी. हे नवीन पोलीस स्टेशन स्थापन करुन कार्यरत करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेतील दोन लिपिकांना शिक्षकांकडून अडीच हजारांची लाच स्विकारतांना पकडल्याबाबत**

**(१६) ४४७२५ (१६-०५-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेतील माध्यमिक शिक्षण विभागातील दोन लिपिकांना शिक्षकांकडून अडीच हजारांची लाच स्विकारतांना दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) श्री.संयम हुकिरे, शिक्षक यांना वरिष्ठ वेतन श्रेणी मिळणेबाबतचे प्रकरण शिक्षण अधिकारी यांच्यासमोर सादर करण्यासाठी रुपये २,५००/- लाचेची रक्कम स्विकारल्याच्या अनुषंगाने श्री.विनायक पाटील, कनिष्ठ सहायक व श्री.विकास लाड यांचेविरुध्द दिनांक १२.०१.२०१६ रोजी शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.क्र.१४/२०१६, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण होवून आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोप दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कोल्हापूर यांनी शासन सेवेतून निलंबित केले आहे.

---

**अकोला जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील लिपीकास लाच घेताना अटक केल्याबाबत**

**(१७) ४४७५५ (१७-०५-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयातील लाचखोर लिपीकास एक हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने माहे जानेवारी, २०१६ मध्ये अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य खात्याच्या सदर लिपिकास प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाने लाचखोरी प्रकरणी ३ वर्षाची शिक्षा सुनावल्यानंतरही आरोग्य विभागातील दुसऱ्या लिपिकाने ३२ हजार रुपयाची लाच घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६)** :(१) होय, या प्रकरणी दाखल गु.र.क्र. ३०१०/२०१६ मध्ये मा.विशेष न्यायालय, अकोला येथे दोषारोपपत्र दाखल करणत आले असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) सन २००२ मध्ये कृष्णा पराते, वरिष्ठ लिपीक, उपसंचालक कार्यालय, आरोग्य विभाग, अकोला यांनी रुपये ३२,०००/- इतकी लाचेची रक्कम स्विकारल्या प्रकरणी त्यांचेविरुध्द दाखल गुन्ह्यामध्ये मा.विशेष जिल्हा व सत्र न्यायाधिश यांनी दिनांक २२.०१.२०१६ रोजी आरोपी श्री.पराते यास दोषी ठरविले आहे. त्यानुसार उपसंचालक, आरोग्य विभाग, अकोला यांचे दिनांक १७.०२.२०१६ च्या आदेशान्वपये श्री.कृष्णा पराते यास शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

---

## खानापूर (जि.सांगली) येथील पोलीस औट पोस्टच्या इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(१८) ४५३३२ (१७-०५-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (जि.सांगली) येथील पोलीस औट पोस्टच्या इमारतीची दुरवस्था झाली असून सदर जीर्ण इमारतीत पोलीस कारभार चालत असल्यामुळे येथील कर्मचारी जीव मुठीत घेऊन काम करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त इमारत नव्याने बांधण्याबाबत वा दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६)** :(१) व (२) खानापूर (जि.सांगली) येथे पोलीस दूरक्षेत्राकरीता कार्यालयीन इमारत बांधकाम करण्यासाठी सुधारीत दरसूचीवर आधारीत खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्यात येऊन, निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुंडलवाडी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील पोलिस कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी निवासस्थाने बांधण्याबाबत

**(१९) ४६०१८ (२०-०५-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंडलवाडी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील पोलिस ठाणे अंतर्गत कार्यरत पोलिस कर्मचारी व अधिकारी यांच्यासाठी आवश्यक असलेली शासकीय निवासस्थानाची सोय नसल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने नविन शासकीय

निवासस्थाने बांधण्यासंबधीची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करुन केली असूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवासस्थाने बांधण्याबाबत कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६) :**(१) व (२) कुंडलवाडी, ता.मुखेड, जि.नांदेड येथील पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता शासकीय निवासस्थाने बांधण्याबाबत ढोबळ अंदाजपत्रक व नकाशा तयार करण्यासाठी क्षेत्रिय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वडसा (जि.गडचिरोली) न्यायालयातून वाघाचा कुख्यात शिकारी कट्टू पारधी फरार झाल्याबाबत**

**(२०) ४६१५४ (१६-०५-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडसा (जि.गडचिरोली) न्यायालयातून भंडारा कारागृहात आणतांना वाघाचा कुख्यात शिकारी कट्टू पारधी पोलिसांना चकमा देवून फरार झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) व (३) संबंधित पोलीस हवालदार यांने कर्तव्यात कसूरी केल्याबाबत दि. २७/०१/२०१६ रोजी निलंबित केले असून त्याची प्राथमिक चौकशी सरु करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयातील फरार आरोपी राहुल ऊर्फ कट्टू गुलाबसिंग या आरोपीबाबत माहिती घेवून त्यास अटक करण्याबाबत सर्व राज्यातील पोलीस आयुक्त आणि सर्व राज्यातील पोलीस आयुक्त आणि सर्व पोलीस अधिक्षक यांना बिनतारी संदेश तसेच आरोपीचे वर्णन व फोटे असलेली शोध पत्रिका तयार करुन त्या शोध पत्रिका सर्व राज्यांना पाठवून शोध घेण्यात येत आहे. मा.प्रथम श्रेणी Case mo.१०/२०१५ state V/S Rahul @ Gulabsing Date २९/०१/२०१६ अन्वये त्यास फरार घोषीत केले आहे. आरोपी शोधकामी वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच आरोपीबाबत माहिती मिळविणेकामी स्थानिक पोलीसांना तसेच स्थानिक लोकांना सूचित करण्यात आले आहे.

---

**पुसद शहरात मेंढीया मशिद जवळ अब्दुल मलिक नावाच्या इसमाने राज्य राखीव पोलीस दलाच्या जवानांवर हल्ला केल्याबाबत**

**(२१) ४६१५८ (२४-०५-२०१६). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद शहरात मेंढीया मशिद जवळ अब्दुल मलिक नावाच्या इसमाने राज्य राखीव पोलीस दलाच्या जवानांवर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला केल्याचे दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आरोपी दहशतवादी संघटनेचा प्रतिनिधी असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी दहशतवाद विरोधी पथक गु.र.क्र. १३/२०१५ कलम ३०७, ३३२, ३३३, १५३, ३५३, १८६, १०९, १२०(ब) भा.दं.वि. सह कलम ४, ५ भारतीय हत्यार कायदा, सह कलम १३५ मु.पो.का सह कलम १६,१८ बेकायदेशीर कृत्य (प्रतिबंध) अधिनियम १९६७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिवील (ता.पोलादपूर, जि.रायगड) गावात दवे कुटुंबियांना वाळीत टाकण्यात आल्याबाबत**

**(२२) ४६३१७ (१७-०५-२०१६). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिवील (ता.पोलादपूर, जि.रायगड) गावात गतवर्षी निष्पन्न झालेल्या वाळीत टाकण्याच्या प्रकरणी अटक करण्यात आलेले दिवील तंटामुक्ती गाव अध्यक्ष, ग्रामसेवकांसह २३ आरोपी जमिनीवर सुटून आल्यावर त्यांनी अन्य ग्रामस्थांना सोबत घेऊन १६ जणांच्या दवे कुटुंबाला वाळीत टाकल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गावातील पंच पुढारी सातत्याने अडवणूक, शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देत असल्याने सततच्या जाचाला कंटाळून दवे कुटुंबियांनी सामुहिक आत्मदहन करण्याच्या मनस्थितीत असल्याबाबतची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) दवे कुटुंबियांना वाळीत टाकण्या संदर्भात सन २०१५ व सन २०१६ मध्ये गुन्हा दाखल नाही.
(२) होय, रस्त्यामध्ये शौचालयाचे बांधकाम केल्यामुळे होत असलेल्या त्रासाबाबत व गावांतील लोकांनी टाकलेल्या वाळीत बहिष्काराबाबत न्याय मिळणेकरीता दि.२६.०१.२०१६ रोजी तहसिल कार्यालयासमोर आमरण उपोषण तसेच आत्मदहन करण्याचा इशारा दिलेला होता. त्याबाबत त्यांनी तक्रार अर्ज दिलेला होता.
(३) रस्त्यावर शौचालय बांधण्याकरीता खड्डा खोदला म्हणून दिलेल्या तक्रारी वरुन पोलादपुर पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा रजि.नं.१३६/२०१५ भादंवि. कलम ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे अर्जदारावर एन.सी. दाखल करुन प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२७.०१.२०१६ रोजी पोलीस निरीक्षक व तहसिलदार यांनी सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांनी बैठक घेतली सदर बैठकीत रस्त्यामधील विनापरवाना बांधलेले शौचालय काढुन टाकण्याच्या सूचना दिल्या.

एकंदरीत सदरचा वाद हा वैयक्तीक असून सदर प्रकरण वाळीत टाकुन बहिष्काराबाबत असल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरात पोलीस मनुष्यबळ वाढविण्याबाबत

**(२३) ४६४०३ (१७-०५-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथे रामनगर व शहर पोलीस ठाण्यांअंतर्गत एकुण ०९ पोलीस चौक्या असुन यातील पठाणपुरा, वडगाव, बाबुपेठ व शास्त्रीनगर या पोलीस चौक्या बहुतांश वेळा बंद राहत असल्याचे माहे जुलै, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर चौक्या सुरु ठेवण्याबाबत तसेच शहरात पोलीस मनुष्यबळ वाढविण्या संदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) नाही, हे खरे नाही.

रामनगर पोलीस ठाणे व चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यातंर्गत असलेल्या चौक्या सुरु आहेत.
(२) पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या आस्थापनेवर पोलीस अधिकारी/कर्मचारी संवर्गातील १८८ पदे व २ पोलीस ठाणे मंजूर करण्यंत आली आहेत. पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांनी पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्य पोलीस दलामध्ये १२५४९ पदे निर्माण करण्याचा सादर केलेला प्रस्ताव विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात तसेच विभागीय स्तरावरील जिल्ह्यात अल्पसंख्यांक विद्यार्थीकरिता वसतिगृहांचे बांधकाम करण्याबाबत**

**(२४) ४६७३७ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच विभागीय स्तरावरील जिल्ह्यात अल्पसंख्यांक विद्यार्थीकरिता वसतिगृहांचे बांधकाम करण्याबाबतची मागणी अल्पसंख्यांक समाज धुरिणांनी, समाजसेवकांनी तसेच जनप्रतिनिधीबरोबरच अल्पसंख्यांक विध्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/ प्रादेशिक विभागांच्या संबंधित प्रशासनाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर-२०१५ वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यात तसेच विभागीय स्तरावरील जिल्ह्यात अल्पसंख्यांक विध्यार्थीकरिता वसतीगृहांचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६) :**(१) व (२) होय.

(३) अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी सन २००९-१० पासून आतापर्यंत जागा उपलब्ध झालेल्या राज्य योजना व केंद्र योजना अंतर्गत ४५ ठिकाणी वसतीगृह बांधण्यास प्रशासकीय मान्यता देऊन बांधकामासाठी निधी देण्यात आला आहे. राज्यशासन योजना व केंद्रशासन योजना अंतर्गत १० ठिकाणी बांधकाम पूर्णत्वास आले असून प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. उर्वरित ठिकाणी बांधकामानुसार टप्प्याटप्प्याने निधी देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थी / विद्यार्थीनीकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये दुसरे व तिसरे सत्र कार्यान्वित करण्याबाबत**

**(२५) ४६७४२ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अल्पसंख्यांक विद्यार्थी/विद्यार्थीनीकरिता दोन नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि राज्यातील ४२ अल्पसंख्यांक बहुल शहरस्थित असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्यांक विध्यार्थी/विध्यार्थिनीकरिता दुसरे व तिसरे सत्र कार्यान्वित करण्याबाबतची मागणी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील जनप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील धुरिणांनी तसेच विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांनी मा.मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा.राज्यमंत्री (अल्पसंख्यांक

विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या / प्रादेशिक विभागांच्या मुख्याधिकार्यांकडे माहे डिसेंबर-२०१५ वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती औद्योगिक प्रशिक्षण संस्थामध्ये अल्पसंख्यांक विध्यार्थी / विध्यार्थिनीकरिता दुसरे व तिसरे सत्र कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६)** :(१) व (२) संबंधित कार्यालये तसेच सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून अशाप्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे किंवा कसे याबाबतची माहिती घेण्यात येत आहे.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय, दि.२९ ऑगस्ट, २००९ अन्वये राज्यातील ४२ अल्पसंख्याक बहुल भागातील विद्यमान औद्योगिक संस्थेत दुसरी/तिसरी पाळी व बृहन्मुंबईत २ नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मांडवी व नेहरुनगर (कुर्ला) ऑगस्ट, २००९ पासून सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १५ तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थी/विध्यार्थिनीकरिता दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत**

**(२६) ४६७४३ (२८-०४-२०१६). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १५ तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थी / विध्यार्थिनीकरिता दुसऱ्या सत्रात व आवश्यकता भासल्यास तिसऱ्या सत्रात अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतची मागणी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील जनप्रतिनिधी, शैक्षणिक क्षेत्रातील धुरिणांनी तसेच विविध प्रादेशिक विभागातील उच्च/व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थ्यांनी मा. मंत्री (अल्पसंख्यांक विकास), मा. राज्यमंत्री (अल्पसंख्यांक विकास), प्रधान सचिव (अल्पसंख्यांक विकास) तसेच संबंधित जिल्ह्यांच्या/प्रादेशिक विभागांच्या मुख्याधिकार्यांकडे माहे जानेवारी-२०१६ वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती राज्यातील १५ तंत्रनिकेतन संस्थांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील विध्यार्थी/विध्यार्थिनीकरिता दुसऱ्या सत्रात व आवश्यकता भासल्यास तिसऱ्या सत्रात अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यकवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६) :** (१) व (२) संबंधित कार्यालये तसेच सर्व जिल्हाधिकारी यांचेकडून अशाप्रकाराचे निवेदन प्राप्त झाले आहे किंवा कसे याबाबतची माहिती घेण्यात येत आहे.

(३) विद्यमान शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये अल्पसंख्याक विद्यार्थ्यांयसाठी सन २०११-१२ पासून ठाणे, सोलापूर, जळगाव, नांदेड, यवतमाळ, मुंबई शहर व मुंबई उपनगर या ७, सन २०१२-१३ पासून रत्नागिरी, जालना, अंबड, ब्रह्मपूरी, कराड या ५ व सन २०१४-१५ पासून पुणे, लातूर व हिंगोली या ३ याप्रमाणे एकूण १५ ठिकाणी दुसरी पाळी सुरु करण्यात आली असून त्याबाबतचे शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अनुक्रमे दि.१३.०९.२०११, दि.१९.७.२०१२ व दि.०८.०७.२०१४ रोजी निर्गमित केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिकरोड मध्यवती कारागृहाच्या चिमणबाग आवारात खुले कारागृह उभारण्याबाबत

**(२७) ४७३७६ (२०-०५-२०१६). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या चिमणबाग आवारात खुले कारागृह उभारण्यास माहे जुलै, २०१५ मध्ये प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, खुल्या कारागृहाच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन दिला नसल्याने सदरचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि, नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहाच्या चिमणबाग आवारात खुले कारागृह उभारण्यास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धते बाबत आवश्यक कार्यवाही सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व वित्त विभागाची मान्यता प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये गत ५ वर्षात १२ कर्मचाऱ्यांना लाच घेतांना पकडण्यात आल्याबाबत

**(२८) ४७७०८ (१७-०५-२०१६). श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेमध्ये गत ५ वर्षात १२ कर्मचा-यांना लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईत विलास लाड या कर्मचाऱ्याला लाच घेतांना पकडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२६-०७-२०१६)** :(१) सन २०११ ते ३१.०५.२०१६ अखेर कोल्हापूर जिल्हापरिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समितीमधील एकूण १० अधिकारी/कर्मचारी यांना लाचेच्या सापळा प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर यांनी पकडले आहे.

(२) होय.

(३) व (४) श्री.संयम हुकिरे शिक्षक यांना वरिष्ठ वेतन श्रेणी मिळणेबाबतचे प्रकरण शिक्षण अधिकारी यांच्यासमोर सादर करण्यासाठी रुपये २,५००/- लाचेची रक्कम स्विकारल्याच्या अनुषंगाने श्री.विनायक पाटील, कनिष्ठ सहायक व श्री.विकास लाड यांचेविरुध्द दिनांक १२.०१.२०१६ रोजी शाहुपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.क्र.१४/२०१६ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम, १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण होवून आरोपी लोकसेवक यांचेविरुध्द न्यायालयात दोषारोप दाखल करण्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद कोल्हापूर यांनी शासन सेवेतून निलंबित केले आहे.

---

**खेड तालुक्यात (जि.पुणे) ग्रामीण भागात शाळेच्या वेळापत्रकानुसार**
**एस.टी. सुविधा उपलब्ध नसल्याबाबत**

**(२९) ४८२२२ (२८-०४-२०१६). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड तालुक्यात (जि.पुणे) ग्रामीण भागात शाळेच्या वेळापत्रकानुसार एस.टी. सुविधा उपलब्ध नसल्याने शाळेतील मुले रोज ५ ते ६ किमी पायी शाळेत जात असल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत माहे जानेवारी २०१६ वा त्या सुमारास ग्रामपंचायतींनी आगारप्रमुख, खेड यांसकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हेहि खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनांच्या अनुषंगाने शाळेच्या मुलांच्या सोयीनुसार एस.टी. सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१६-०७-२०१६) :**(१) नाही.
(२) होय.
(३) ग्रामपंचायतीने केलेल्या निवेदनानुसार सकाळी ०७.०० वा. राजगुरुनगर-वांद्रा व ०९.०० वा. वांद्रा ते राजगुरुनगर या फेऱ्या दि.०२ जानेवारी, २०१६ पासून सुरु करण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयात दलित व आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारात वाढ झाल्याबाबत**

**(३०) ४८४२९ (२०-५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्हयात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे न केल्यामुळे दलित व आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारात गत तीन वर्षात मोठ्याप्रमाणात वाढ झाली असून अत्याचाराच्या अनेक प्रकरणांचा तपास पूर्ण होवून गुन्हे सिद्ध होऊनसुद्धा शिक्षा झाल्याचे एकही प्रकरण दिसून येत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रांत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायद्यान्वये दलित व आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारा संदर्भात सन २०१३ मध्ये २७ गुन्हे, सन २०१४ मध्ये ३०, सन २०१५ मध्ये ३७ व सन २०१६ माहे मे अखेर पर्यंत २२ असे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्ह्यांपैकी सन २०१३ व सन २०१४ मधील प्रत्येकी १ याप्रमाणे २ गुन्हे सन २०१६ माहे एप्रिल व मे मध्ये शाबीत झालेले आहेत.
(२) गुन्हे शाबीतीच्या दृष्टीने न्यायालयातून सुटलेल्या (acquitted) केसेसचा अभ्यास करुन त्यावर वेळीच प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अपर पोलीस अधीक्षक, रायगड यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे गुन्हे शाबीतीच्या प्रमाणात वाढ होण्याचे दृष्टीने जिल्हा व तालुका पातळीवर संनियंत्रण समिती स्थापीत करण्यात आलेली आहे. तसेच महत्वाचे गंभीर गुन्ह्यात अनुभवी खाजगी वकीलांची नेमणूक शासन निर्णयानुसार करण्यात येत आहे.

तसेच न्यायालयातुन सुटलेल्या केसेसच्या अनुषंगाने प्रत्यक्ष जबाबदारी निश्चित करुन, प्रसंगी कसूरदार तपासी अधिकारी यांच्या गोपनीय अहवालात प्रतिकुल नोंदी घेवून संबंधीतांवर कठोर कारवाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद विभागीय कार्यालयाची शासकीय वेबसाईट हॅक करण्यात आल्याबाबत**

**(३१) ४८४३८ (२०-०४-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागीय कार्यालयाची शासकीय वेबसाईट दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१५ व २६ डिसेंबर, २०१५ रोजी विदेशी हॅकर्सकडून दोनदा हॅक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वेबसाईट हॅक करण्याऱ्यां हॅकर्सकडून वेबसाईट वारंवार हॅक करण्याचा इशाराही देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने औरंगाबाद विभागीय कार्यालयाच्या वेबसाईट सुरक्षेच्या दृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) उक्त प्रकरणी पोलीस स्टेशन, सिटी चौक, औरंगाबाद येथे अज्ञात व्यक्ती विरुध्द विभागीय आयुक्त कार्यालयाकडून गुन्हा नोंदविण्यात आला आहे. विभागीय आयुक्त कार्यालयाची वेबसाईट जिल्हा विज्ञान सुचना केंद्र, औरंगाबाद यांचेकडे (सुरक्षित सर्वरवर) वर्ग करण्यात आले आहे. सर्व मंत्रालयीन विभागाना तसेच संलग्न/अधिनस्त असलेल्या कार्यालयाच्या वेबसाईचे सेक्युरिटी ऑडिट करुन घेण्याबाब सूचनाही निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**रत्नागिरी जिल्हयातील संवेदनशील सागरी भागात सी.सी.टी.व्ही. बसविण्याबाबत**

**(३२) ४८७८३ (१७-०५-२०१६). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील संवेदनशील सागरी भागात दहशतवादी कारवाया आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सी.सी.टी.व्ही. बसविण्यात येणार असून याकरिता २८ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सी.सी.टी.व्ही. कॅमेरे कोणकोणत्या ठिकाणी बसविण्यात येणार आहे व त्याकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली असून त्यावर अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.

रत्नागिरी जिल्हयातील सागरी संवेदनशील भागात ४१ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे निश्चित करण्यात आले आहे.

(२) व (३) रत्नागिरी जिल्हयातील मुख्य ठिकाणी चेकपोस्ट, महामार्ग, फेरीबोट धक्का व समुद्र बीच या ठिकाणी सीसटीव्ही यंत्रणा बसविण्यात येणार आहेत. त्याकरीता नाविन्यपुर्ण योजनेतून रु.१ कोटी ३५ लाख ११ हजार मंजूर करण्यात आलेले आहेत.

सीसीटीव्ही बसविण्याचे काम सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभागामार्फत निविदा पध्दतीने करण्यात येणार आहे.

---

**मोताळा (जि.बुलढाणा) येथे पोलीस चौकी सुरू करणेबाबत**

**(३३) ४९२३५ (२०-०५-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोताळा (जि.बुलढाणा) येथे नव्याने नगर पंचायत निर्माण झाली असुन येथील लोकसंख्या ११००० असतांना सुध्दा अद्यापपर्यंत पोलिस चौकी नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पोलिस चौकी सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे खर आहे.

मोताळा गावाला लगतच बोराखेडी हे गांव असुन बोराखेडी येथे सन १९३१ पासून पोलीस ठाणे कार्यान्वित करण्यात आलेले आहे. मोताळा हया गावात सन २०१६ पासून नव्यानेच नगर पंचायत निर्माण झालेली आहे. बोराखेडी येथे पोलीस ठाणे कार्यान्वित असल्यामुळे व मोताळा हे गाव बोराखेडी ठाण्याच्या हद्दीजवळ असल्याने मोताळा येथे स्वतंत्र पोलीस चौकी सुरु करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरपूर मोहोळ मार्गावरील भैरवनाथवाडीजवळ (जि.सोलापूर)**
**अंगणवाडी सेविकांच्या जीपला झालेला अपघात**

**(३४) ४९६९५ (१६-०५-२०१६). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर मोहोळ मार्गावरील भैरवनाथ वाडीजवळ (जि.सोलापूर) अंगणवाडी सेविकांच्या जीपला टेम्पोची धडक बसल्याने झालेल्या अपघातात जीप चालकांसह ६ वर्षाचा मुलगा ठार झाला असून अंगणवाडी सेविकांसह ९ जण जखमी झाल्याची घटना दिनांक ८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी करुन अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीच्या कुटुंबाना तसेच गंभीर जखमी झालेल्या अंगणवाडी सेविकांना कोणत्या स्वरुपाची मदत करण्यात आली वा येत आहे तसेच या महामार्गावर वारंवार होत असलेले अपघात टाळण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर घटनेत २ जण मृत्युमुखी व ११ जण जखमी झाले आहेत.

(२) दि.८.२.२०१६ रोजी टेम्पो चालकाने भरधाव वेगाने टेम्पो चालवून समोरुन येणाऱ्या बोलेरो जीपला धडक दिल्याने सदर अपघात झाल्याचे पोलीसांनी केलेल्या तपासात निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे गु.रं.नं. १२३/२०१६, भा.द.वि.सं. कलम ३०४ (अ), २७९, ३३७, ३३८ सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

घटनेमधील मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना व जखमींना मोटार अपघात दावा न्यायाधिकरणामध्ये नुकसान भरपाई दावा दाखल करण्याकरीता, तसेच विमा कंपनीकडे दावा दाखल करण्याकरीता आवश्यक ती कागदपत्रे पुरविण्यात आली आहेत.

अपघात टाळण्यासाठी राज्य मार्गावरील अडथळा करणारी झाडे व आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कसुरदार वाहनचालकांवर सन २०१५ आणि मे, २०१६ अखेर अनुक्रमे १,३६५ व १,८३७ केसेस करुन त्यांच्याकडून रु.१,७४,०००/- व रु.२,५३,९००/- दंड वसूल केला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदीग्राम एक्सप्रेसने नाशिक रोड येथे आलेल्या महिला उपनिरीक्षकाचा विनयभंग करण्यात आल्याबाबत**

**(३५) ४९७०२ (१६-०५-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथून नंदीग्राम एक्सप्रेसने दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी नाशिक रोड येथे आलेल्या महिला उपनिरीक्षकाचा विनयभंग केल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीची नाशिक रोड पोलिसांनी काही तासातच सुटका केली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महिला पोलीस अधिकाऱ्याचा विनयभंग केलेल्या आरोपीची सुटका केल्यामुळे अशा प्रवृत्तीत वाढ होत असल्याने याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) नाही.

महिला उप निरीक्षक यांचे तक्रारीवरुन आरोपी विरुध्द नाशिक रोड पोलीस स्टेशनला गुरनं.३२५/१५ भादवि कलम ३५४ (अ)(१) ५०९, ५०४, ५०६ प्रमाणे दिनांक २५.१२.२०१५ राजी गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक करुन मा.न्यायालयात त्याच दिवशी दाखल करण्यात आले असता मा.न्यायालयाने त्याचा जामीन मंजूर केला आहे. गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(२) पोलीस आयुक्तालय स्तरावर प्रतिसाद ॲप चालू करण्यात आले असून, महिला व नागरीकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती केली जात आहे. विनयभंगाने गुन्हे तपास करुन २ दिवसात आरोपींवर खटले मा.न्यायालयात सादर करण्याबाबत सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सुचना देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कुंभारी पिंपळगाव व तिर्थपुरी येथे पोलीस ठाणे स्थापन करणेबाबत**

**(३६) ५००९० (२०-०५-२०१६). श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घनसावंगी (जि.जालना) तालुक्यातील कुंभारी पिंपळगाव व तीर्थपुरी येथे पालीस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) व (२) कुंभारी पिंपळगाव व तीर्थपुरी येथे पोलीस ठाणे स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चिमूर शहरात (जि.चंद्रपूर) असलेले भोसलेकालिन पुरातन तलाव बुजवून अनधिकृत बांधकाम केल्याबाबत**

**(३७) ५०१४४ (०५-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिमूर शहरात (जि.चंद्रपूर) असलेले भोसलेकालिन पुरातन तलाव व्यापा-यांकडून व्यावसायिक प्रतिष्ठाने थाटून बुजविण्यात येत असल्याने या तलावाचे अस्तित्व धोक्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार अनधिकृत बांधकाम काढण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय चंद्रपूर येथे श्री.हरी बालाजी देवस्थान नोंद.क्र.४३(चं) या क्रमांकाने नोंदणीकृत असून, सदर संस्थेच्या परिशिष्ट १ वर तलावाची नोंद आहे. परंतू तो भोसलेकालीन असल्याची नोंद नाही. सदर संस्थेच्या निरीक्षक चौकशी दरम्यान सदर संस्थेला व तलावाला चंद्रपूर कार्यालयातील

निरीक्षकाने प्रत्यक्ष भेट दिली व संस्थेचे विश्वस्त यांचे बयान नोंदविले, त्यावरुन असे दिसून आले की, सदर संस्थेने तलावाच्या जुन्या पाळीवरील पश्चिम-दक्षिण ते उत्तर पूर्व चक्राकार पाळ ही भाडे करारावर वेगवेगळ्या व्यापाऱ्यांना दिलेली आहे. त्या भाडेकरुंपैकी काही भाडेकरुंचे बयान नोंदविले, त्यावरुन व प्रत्यक्ष पाहणी वरुन असे निष्पन्न झाले की, भाडेकरुंनी करारावर घेतलेल्या जागे व्यतिरीक्त पाळीच्या पाठीमागील बाजूस तलावाच्या क्षेत्रात अतिक्रमण करुन ठेवलेले आहे. सदर तलावाच्या जुन्या पाळी पाठीमगे काही अंतरावर नवीन पाळ तलाव सौंदर्यकरण म्हणून तयार करण्यात आलेली आहे. व्यापाऱ्यांनी केलेल्या अतिक्रमणामुळे तलावाचे क्षेत्र कमी झालेले आहे व नविन पाळ टाकल्यानेही तलावाचे क्षेत्र कमी झालेले आहे.

(२) सदर बाबींची निरीक्षकामार्फत चौकशी सुरु आहे. वर नमुद केलेली बाब निरीक्षक चौकशीत निष्पन्न झालेली आहे. तसेच अतिक्रमण काढून टाकणेकरिता, संस्थेमार्फत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय चंद्रपूर कार्यालयातील निरीक्षकांना सखोल चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात महिलांवरील अत्याचार रोखण्याबाबत**

**(३८) ५०१५० (१६-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात गत वर्षभरात बलात्कारांच्या ३२, विनयभंगाच्या ६१ तर अन्य महिलांवर छळ, मारहाण व हुंडाविषयक अशा ७१ घटनांच्या नोंदी शहर आणि रामनगर पोलिस ठाणे हद्दीत करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणासंदर्भात तसेच महिलांवरील अत्याचार रोखण्याकरिता कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय.

(२) महिलांवरील अत्याचार रोखण्याकरिता चंद्रपूर जिल्ह्यात पुढील उपाययोजना करण्यात येते :-

-- हेल्पलाईन क्र. १०९१ सुरु करण्यात आले आहे.

-- वर्दळीचे ठिकाणी पिसीआर व्हॅन, महिला सुरक्षा पथक, मोटार सायकलवर दोन पोलीस कर्मचारी असे मार्शलची नियुक्ती.

-- शाळा, महाविद्यालये पोलीस विभागातर्फे शिबीराचे आयोजन करुन कायदा व संरक्षण संबंधी जनजागृती करण्यात येते.

-- एनजीओ मार्फत पोलीस विभागातर्फे महिला व मुलींना कराटेचे प्रशिक्षण देण्यात येते.

-- महिलांचे तक्रारीची तात्काळ दखल घेण्याकरिता जिल्ह्यामध्ये दामीनी पथक तयार करण्यात आले आहे.

-- पोलीस नियंत्रक कक्षात दुरध्वनी द्वारे तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ नजिकच्या पोलीस स्टेशनला माहिती देऊन कार्यवाही करतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्‌यकिय अधिका-याने महिलेचा विनयभंग केल्याबाबत**

**(३९) ५०१५९ (१६-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्‌यकिय अधिका-याने विवाहित महिलेचा दिनांक १६ जानेवारी, २०१६ रोजीच्या सुमारास विनयभंग केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय.

(२) दि.१६.१.२०१६ रोजी फिर्यादी महिला ग्रामीण रुग्णालय बल्लारशाह येथे आजाराचा उपचार करण्यासाठी गेले असता आरोपी डॉक्टरने पिडीत फिर्यादी महिलेचा विनयभंग केला अशी तक्रार दिल्यावरुन पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र.३८/२०१६ कलम ३५४ (अ)(१) भादविअन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात सत्यता आढळून न आल्याने तसेच फिर्यादीने खोटा रिपोर्ट दिल्याने निष्पन्न झाल्याने “ब” फायनल समरी तयार करुन मंजूरीकरिता पाठविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आष्टी (जि.बीड) येथे पोलीस उपविभागीय अधिकारी कार्यालयाची इमारत उभारण्याबाबत**

**(४०) ५०२२९ (१६-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) येथे पोलीस उप विभागीय अधिकारी कार्यालयाची इमारत उभारण्यासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६)** :(१) हे खरे नाही.
(२) आष्टी, जि.बीड येथे पोलीस उप विभागीय अधिकारी कार्यालयाची इमारत बांधकाम करण्यासाठी सुधारीत दरसूचीवर आधारीत खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरणी निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कडा (जि.बीड) येथे स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत**

**(४१) ५०२३१ (१६-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कडा (जि.बीड) येथे वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी स्वतंत्र पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबतची मागणी मा. लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरीकांनी सातत्याने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) पोलीस ठाणे आष्टी व पोलीस ठाणे अंभोरा यांचे विभाजन करुन नियोजीत कडा पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडून पोलीस महासंचालक, म.रा., मुंबई यांना प्राप्त झाला होता. तथापि सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालकांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडून अधिक माहिती मागविली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिह्यात वाहन धारकांकडून हायवे वाहतूक पोलीस अवैध वसुली करीत असल्याबाबत**

**(४२) ५०३८४ (१७-०५-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिह्यात दिनांक १० ते २४ जानेवारी पर्यंत राबविण्यात येणा-या रस्ता सुरक्षा अभियानासाठी वाहन धारकांकडून हायवे वाहतूक पोलीस अवैध वसुली करीत असल्याचा प्रकार नुकताच निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अभियानाला येणा-या खर्चाची पुर्तता करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वरील गडेगाव येथील हायवे वाहतूक पोलीसांकडून वाहनधारकांना अडवून वसुली केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही.
हायवे पोलीस अवैध वसुली करीत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील इंटरनॅशनल एअर पोर्ट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांवर मोटार पार्किंग उभारल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत

**(४३) ५१४३८ (१६-०५-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील छत्रपती शिवाजी विमानतळावरील टी २ टर्मिनल जवळ सुरक्षेचे नियम धुडकावून बहुमजली मोटार पार्किंग उभारल्याप्रकरणी मुंबई इंटरनॅशनल एअर पोर्ट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक व विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांवर दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी सहारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
मा.अति.मुख्य महानगर दंडाधिकारी सो, २२ वे न्यायालय, अंधेरी, मुंबई यांनी सी.आर.पी.सी. कलम १५६ (३) अन्वये आदेश दिल्यावरुन सहार पोलीस ठाणे येथे दिनांक १२.०२.२०१६ रोजी फिर्यादी श्री.विश्वास भांबुरकर, सामाजिक कार्यकर्ते यांच्या फिर्यादीवरुन गु.र.क्र. MECR क्र. ०१/२०१६, कलम ४६७, ४६८, ४७१, ४२०, १२० (ब) व्हा. द.वि. सह कलम ३अ, ३अ (२) सप्रेशन ऑफ अनलॉफुल ॲक्ट अगेस्ट सेप्टी ऑफ सिव्हील एव्हीएशन ॲक्ट १९८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांताक्रूझ पूर्व, मुंबई येथील अवैध गाड्यांच्या डम्पिंग संदर्भात

**(४४) ५२०३७ (२८-०४-२०१६). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आनंद नगर, नेहरू रोड, सांताक्रूझ पूर्व येथे अवैधरित्या वाकोला पोलिस स्टेशन कडून मोडकळीस आलेल्या, अपघातग्रस्त व जप्त केलेल्या गाड्या गार्डनमध्ये, रस्त्यावर तसेच पादचारी मार्गावर ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, या डम्प केलेल्या गाड्यांमधील काही भाग गर्दुले व दारुडे चोरत असल्यामुळे तेथे चोरीचे वातावरण देखील उद्भवल्याचे समजते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या गाड्यांचा आडोसा घेऊन इतर येणारे जाणारे पादचारी तेथे घाण करत असल्यामुळे दुर्गंधीचा त्रास तेथील रहिवाश्यांना सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त परिसरातील अवैध्यरित्या डम्प केलेल्या गाड्यांची व्यवस्था इतरत्र करण्यासाठी काही उपाययोजना केली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) वाकोला पोलीस ठाण्याकडून गुन्ह्यात तसेच बेवारस स्थितीमध्ये मिळून आलेली वाहने पोलीस ठाण्यासमोरील पत्राच्या बंदीस्त जागेत ठेवण्यात आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) सदरची वाहने ही गुन्ह्यात तसेच बेवारस स्थितीमध्ये मिळून आलेली आहेत. गुन्ह्यातील वाहनांबाबत केसेसचा निकाल न लागल्यामुळे वाहनांची विल्हेवाट लावता येत नाही. तसेच, अन्यत्र जागा उपलब्ध नसल्यामुळे पोलीस ठाण्यासमोर ठेवण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) ग्रामपंचायतीचे**
**सरपंचानी राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याबाबत**

**(४५) ५२४४९ (२०-०५-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पानीव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. मालन बाबर तसेच ग्रामसेवक कैलास सुरवसे यांनी २६ जानेवारी, २०१६ रोजी राष्ट्रध्वज उलटा फडकावून राष्ट्रध्वजाचा अवमान केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रध्वजाचा अवमान केल्याप्रकरणी पानीव येथील ग्रामस्थांनी त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी मा.मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी ,तहसिलदार, गटविकास अधिकारी, पोलीस ठाणे, माळशिरस यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणात दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) राष्ट्रध्वज उलटा फडकावला गेला, हे खरे आहे तथापि यास ग्रामपंचायतीचे कर्मचारी जबाबदार असल्याचे आढळून आले.
(२) होय.

(३) राष्ट्रध्वज उलटा फडकावण्याच्या प्रकरणी सकृत दर्शनी दोषी आढळलेले ग्रामपंचायत पानीव ता.माळशिरस, जि.सोलापूर चे कर्मचारी श्री.धनाजी य. खवळे आणि श्री.पोपट नोमदेव गुजर यांच्यावर पोलीस स्टेशन अकलूज ता.माळशिरस येथे राष्ट्रगौरव अपमान प्रतिबंधक अधिनियम, १९७१ कलम २ नुसार एफ.आय.आर. नंबर ५१/२०१६ दिनांक २८/०१/२०१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चाळीसगाव (जि.जळगाव) शहरात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणेबाबत**

**(४६) ५२५१० (२४-०५-२०१६). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) शहरात चोऱ्या, हाणामाऱ्या होत असल्याने त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सीसी टीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेवून सर्वेक्षण करण्यात आले असून चार महिन्याचा कालावधी नंतरही अद्याप सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चाळीसगाव शहरात सी.सी.टीव्ही कॅमेरे बसविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०७-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) नगरपालिका चाळीसगांव प्रशासनाने चाळीसगांव शहरात "बायोनियर कॉम्प्यु" जळगांव यांचे माध्यमातून सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत ठरविले होते परंतू काही कारणास्तव सदरचे काम पुर्ण होऊ शकले नाही. तथापि, चाळीसगांव शहरातील मनमाड चौफुली (सिग्नल पॉईंट) भागात शहरातील प्रतिष्ठीत नागरिकांमार्फत २ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून दोन्ही कॅमेरे चालू स्थितीत आहेत.

---

**औसा (जि.लातूर) येथे वरिष्ठस्तर न्यायालयास मंजूरी देण्याबाबत**

**(४७) ५२५१७ (२०-०५-२०१६). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) विधिज्ञ मंडळाने बैठक घेवून औसा येथील न्यायालयात वरिष्ठस्तर न्यायालयाबाबतचा ठराव एक मताने मंजूर करून सन १९९३ पासून सातत्याने मा.मुख्यमंत्री, मा.विधी व न्यायमंत्री, मा.पालकमंत्री, लातूर जिल्हा आदीकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औसा हा तालुका भूकंपग्रस्त असून या तालुक्यात एकूण १२० गावांचा समावेश असून ३ पोलीस स्टेशन व सुमारे १२० हून अधिक विधिज्ञ मागील सुमारे ३० वर्षापासून कार्यरत असून दिवाणी व फौजदारी स्वरूपाची अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याने वरिष्ठस्तर न्यायालयाची गरज असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर न्यायालयास मंजूरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०७-२०१६)** :(१) व (२) औसा येथे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापनेबाबत सन २००५ पासून मागणी करण्यात येत आहे असे दिसून येते. प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी असल्यामुळे व न्यायालय इमारत व न्यायाधिश निवासस्थान बांधण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने औसा येथे दिवाणी न्यायाधिश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालय स्थापनेबाबतचा प्रस्ताव मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या “The Establishment of Court Committee” या समितीने नाकारला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीस वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाल्याबाबत

**(४८) ५२६३९ (१७-०५-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिरोळ (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पोलीस वसाहतीची अत्यंत दुरवस्था झाली असून पोलीसांची कुटुंबे जीव मुठीत घेऊन राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाकडे वारंवार मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पोलीस वसाहतीची दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६)** :(१), (२) व (३) शिरोळ (जि.कोल्हापूर) येथील काही निवासस्थाने दुरुस्ती करण्यायोग्य आहेत. या निवासस्थनांची दुरुस्ती करण्याकरीता क्षेत्रिय कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकम विभागाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगांव (जि.बीड) येथील पोलीस निवावस्थानांची दुरुस्ती करण्यासाठी निधी मिळणेबाबत**

**(४९) ५२८११ (२४-०५-२०१६). श्री.आर. टी. देशमुख (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) येथील १८८ पोलीस निवावस्थानांची दुरुस्ती निधी अभावी प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी उपलबध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०७-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही. पोलीस स्टेशन माजलगांव शहर येथे ४८ निवासस्थाने आहेत. बीड जिल्हयातील निवासस्थानांची दुरुस्ती करण्याकरीता माहे जानेवारी, २०१६ मध्ये रु.१२८.३९ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या निधीतून माजलगांव येथील ४७ निवासस्थानांची दुरुस्ती करण्यंचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे येथील वाहतूक पोलीस यांना बसने धडक दिल्याने ते जागीच ठार झाल्याबाबत**

**(५०) ५३४९६ (१०-०६-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टीएमटीच्या गजानन शेजूळ या बस चालकाने मद्यधुद अवस्थेत बेफामपणे बस चालवत दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी रात्री ठाणे येथील गायमुख जवळ वाहतूक शाखेचे पोलिस नाईक चंद्रकांत साळुंखे या ४४ वर्षीय वाहतूक पोलीसाला बसची धडक दिल्याने ते जागीच ठार झाले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बस चालकाने एका टेम्पोला धडक दिल्याने टेम्पोचालक गंभीररित्या जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त सर्व प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व मृत्यू पावलेल्या वाहतूक पोलीसांच्या कुटुंबियांना कोणत्या प्रकारची आर्थिक मदत दिली वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०७-२०१६) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) पोलीसांनी केलेल्या तपासामध्ये टिएमटी बस चालकाने मद्यप्राशन करुन महानगरपालिकेची बस भरधाव वेगाने चालविल्याने सदर अपघात घडल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी दोषी टीएमटी वाहनचालकावर कासारवडवली पोलीस ठाणे येथे गु.र.नं.६१/२०१६, भा.दं.वि.सं. कलम ३०४, २७९, ३३७, ३३८, सह मो. वा. का कलम १८४ १३४ (अ)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून, न्यायालयामध्ये आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे.

मृत पोलीसांच्या कुटुंबियास एच.डी.एफ.सी. बँकेडून रु.२५ लक्ष व रु.१० लक्ष पोलीस अपघात विमा अशी आर्थिक मदत मिळाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.